८१.१७८६/२००६
प्र-सं - (मिठी नदी)

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणा-या मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयूटीपी) व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (एमयूआयपी) या दोन्ही प्रकल्पासंबंधीत झोपडपट्टी निर्मुलन/पुनर्वसनाबाबतचे धोरण मिठी नदी विकास व संरक्षण या प्रकल्पामुळे बाधित होणा-या झोपडपट्टीवासियांना लागू करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग,
शासन निर्णय क्र.पुनर्व-२००६/प्र.क्र.१४१/झोपनि-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २२ सप्टेंबर, २००६.

**वाचा :-** १) शासन निर्णय, गृह निर्माण व विशेष सहाय्य विभाग क्र.प्रकल्प-१७००/सीआर ३१/स्लम-२, दि.१२.१२.२०००.
२) शासन निर्णय, गृह निर्माण विभाग क्र.पयांयी २००५/ प्र.क्र.१०७/झोपनि-२, दि.१४.११.२००५.

**प्रस्तावना :**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत शहराच्या विकासासाठी राबविण्यात येणा-या मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयूटीपी) व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (एमयूआयपी) या दोन प्रकल्पामुळे बाधित होणा-या झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनासाठी शासनाने संदर्भात नमूद केलेल्या दि.१२.१२.२००० व दि.१४.११.२००५ च्या शासन निर्णयानुसार एक विशेष पुनर्वसन धोरण जाहिर केले आहे. सदर धोरणानुसार या दोन्ही प्रकल्पांमुळे बाधित होणा-या प्रकल्पग्रस्तांना शासनाचे झोपडपट्टी पुनर्वसन विषयक सर्वसाधारण धोरण लागू न करता सामाजिक व आर्थिक पायाभूत सर्वेक्षणात पात्र ठरलेल्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचे धोरण लागू करण्यात आले आहे. मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयूटीपी) व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (एमयूआयपी) या दोन प्रकल्पामुळे बाधित होणा-या झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनाबाबतच्या पात्रतेविषयी जे धोरण लागू केले आहे तेच धोरण मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणांतर्गत राबविण्यात येणा-या मिठी नदी विकास संरक्षण प्रकल्पास लागू करावे किंवा कसे, ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. प्रस्तुत बाबींचा सर्वांगीण विचार करुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय :**

संदर्भात नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयूटीपी) व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (एमयूआयपी) या दोन्ही प्रकल्पामुळे बाधित होणा-या झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनाबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणामार्फत मिठी नदी विकास व संरक्षण प्रकल्प राबविण्यात येत आहे. यास्तव मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयूटीपी) व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (एमयूआयपी) या दोन्ही प्रकल्पामुळे बाधित होणा-या

झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनाबाबत जे विशेष पुनर्वसन धोरण लागू करण्यात आले आहे तेच धोरण मिठी नदी विकास व संरक्षण प्रकल्पासाठी सुध्दा लागू करण्यात येत आहे.

उपरोक्त शासन निर्णयातील तरतूदी फक्त सन १.१.२००० पर्यंतच्या झोपडया व त्यात नियमित वास्तव्य करीत असलेल्या झोपडीधारकास लागू होतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र २००६०९२०१५२२५५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

( स्वा.शि. क्षत्रिय )
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१ मा.राज्यपालांचे सचिव, राज भवन, मुंबई
२ मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३ मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४ मा.मंत्री(महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५ मा.राज्यमंत्री(गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६ मा.राज्यमंत्री(नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७ मा.राज्यमंत्री(महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८ मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
९ प्रधान सचिव(१) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१० प्रधान सचिव(२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११ प्रधान सचिव(महसूल)महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२ प्रधान सचिव(विधी व न्याय विभाग), मंत्रालय, मुंबई
१३ मा.महाअधिवक्ता, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई
१४ महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई
१५ प्रकल्प संचालक, मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण, मुंबई.
१५ आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई.
१६ उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा, मुंबई
१७ मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा.मुंबई ५१
१८ जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा, मुंबई
१९ जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई
२० अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.),(मुंबई शहर/पूर्व उपनगर/पश्चिम उपनगर)
२१ निवड नस्ती (झोपुनि-२), गृहनिर्माण विभाग.

Shri Sonawane